P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad, Maharashtra - 41



प्रेसनोट दिनांक – १४/११/२०२६

दि.१३/११/२०२६ रोजी राजौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- आळंदी ६३६/२०२६ बीएनएस १०९(१),३५२,३५१(२),३(५),सह शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४,२७ सह म.पो.का.कलम ३७(३),१३५,सह क्रिमीनल लॉ.अमेंडमेंट अँक्ट कलम ३,७ प्रमाणे

गुघ.ता.वेळ व ठि. :- दि.१३/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजताचे सुमारास नगरपरिषद बिल्डिंगचे समोर कमानी जवळ पीएमटी चौक, आळंदी, तालुका खेड, जिल्हा पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.१३/११/२०२६ रोजी १९.०५ वा.

फिर्यादी :- सागर दत्ता बडे,वय २२वर्ष, व्यवसाय रिक्षा ड्रायव्हर, सध्या राहणार-अण्णाभाऊ साठे नगर, देहू फाटा, तालुका हवेली, जिल्हा पुणे, मुळगाव बुरके गाव ,तालुका शिरूर, जिल्हा पुणे

आरोपी :- १) पिल्या उर्फ आर्यन नागोराव पंडित वय - २० वर्ष राहणार नगरपरिषद झोपडपट्टी, आळंदी, तालुका खेड, जिल्हा पुणे
२) नव्या उर्फ नवनाथ जाधव वय १९ वर्ष राहणार इंद्रायणी नगर चोवीसावाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे
३) वैभ्या उर्फ वैभव व्यवहारे वय-२०वर्षे राहणार केळगाव, तालुका खेड, जिल्हा पुणे पूर्ण नाव माहित नाही.

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांच्या ताब्यातील ऑटो रिक्षा नंबर. MH12LM ४६०३ ही घेऊन धंद्यासाठी थांबलो असताना आरोपीत यांनी तिघेजण संगणमत करून फिर्यादीजवळ येऊन आ.क्र १ यास दोन लाख रुपये रोख उसने दिलेले मागत असल्याचा मनात राग धरून फिर्यादीशी भांडण करून फिर्यादीलास शिवीगाळ, दमदाटी करून त्यांचे हातातील लोखंडी खंजीर, धारदार शस्त्राने फिर्यादीच्या पोटात, डोक्यात तसेच शरीराचे इतर अवयवावर जोरात सपासप वार करून फिर्यादीला गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि वाघ ७५८८०६६९४७

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी ९१०/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८(१),११५(२), ३५२ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१३/११/२०२६ रोजी सकाळी ०६/३० वा.सुमारास कमलराज दत्त विहारा सोसायटी,ई -४०४,रोहिदास बंबाळे यांचे रुममध्ये भाड्याने,दहु आळंदी रोड,मोशी,पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि १३/११/२०२६ रोजी १८.४६ वा

फिर्यादी :- महिला फियार्दी

आरोपी :- राहुल दतात्रय लष्कर, वय २९ वर्षे,रा.सदर मुळ गाव- मु.पो.चक्करबर्डी,सुरत बायपास हायवे रोड हिंद काँक्रीट जवळ,धुळे ता.जि.धुळे

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी आरोपीत याने फिर्यादीला घराच्या चाव्यांच्या, तसेच फिर्यादी त्यांच्या पगाराचे पैसे घरात खर्च करत नाही या कारणा वरुन हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन, घरातील हेल्मेट फिर्यादीच्या डोक्यात मारला व घरातील ब्लुटुथच्या साऊंडने तोंडावर मारुन जखमी केले व फिर्यादीची आजी मैनाबाई भांडण सोडविण्यासाठी आली असता,तीला देखील शिवीगाळी करुन तिचा पिरगळला. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा/पाटील ९८८११०७७७८

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ५१५/२०२६ भा.न्या.संहिता कलम २८१, १२५(अ (ब), ३२४(४) मो.वा.का १८४, प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१३/११/२०२६ रोजी दुपारी बारा वाजताची सुमारा जुना पुणे मुंबई हायवेवरील पायोनियर हॉस्पिटल समोर पुण्याकडे जाणाऱ्या रोडवर तळेगाव दाभाडे

गुन्हा दाखल :- दि.१३/११/२०२६ स्टे.डा ५१/२६ वेळ २२/४४

फिर्यादी :- राजू ओमप्रकाश गोगलिया वय ५८वर्ष धंदा लेबर रा. चार बंगला हरिजन कॉलनी सराउंडिंग कॉलनी अंधेरी ईस्ट मुंबई४०००६९

आरोपी :- कार नंबर MH 24 CD ५२३३ चालक

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादीची टीव्हीएस कंपनीची जुपिटर गाडी नंबर MH ०२ GW ६ ३३२घेऊन फिर्यादी शिरगाव कडे जात असताना पायोनियर हॉस्पिटल समोर पुण्याकडे जाण-या रोडवर फिर्यादीला पाठीमागून कार नंबर MH २४ CD ५२३३ याने धडक दिल्यामुळे फिर्यादी पुढे जाऊन फिर्यादीची गाडी घेऊन खाली पडलो डाव्या साईडला फिर्यादीच्या डाव्या पायावर जुपिटर पडल्याने फिर्यादीच्या डाव्या पायाच्या गुडघ्या खाली नडगी फ्रॅक्चर झाल्याने फिर्यादी खाली पडले व डाव्या हाताच्या कोप-याला खरचटले व गाडीचे पूर्ण नुसकान झाले म्हणून.

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा/खेडकर ९४०४६०१००८

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- दक्षिण महाळुंगे ९२०/२०२६ बी.एन.एस. २८१, १२५(A), १२५(B), ३२४(२ मो.वा.का.क. १८४, १३४(ए)(बी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०५/११/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा.चे सुमारास मौजे कुरुळी ता.खेड जि.पुणे गावचे हददीत पुणे ते नाशिक हायवे रोडवर चिंबळी फाटया जवळ

गुन्हा दाखल :- दि.१३/११/२०२६ रोजी १३.०४ वा

फिर्यादी :- महिला फियार्दी

आरोपी :- प्रसाद चांगदेव कुहीले वय ३९ वर्षे व्यवसाय नोकरी रा.कोपरगांव ता.कोपरगांव जि.अहिल्यानगर

तपशिल :- नमुद ता.वेळी व ठिकाणी आरोपी याने त्याचे ताब्यातील हुंडाई कंपनीची आय २० गाडी नंबर एम एच ०१ ए व्ही ७९३८ ही पुणे बाजुकडून नाशिक कडे चालवित घेवुन जात असतांना तिची फिर्यादीचे वडील वसंत रामराव पखाली वय ५८ वर्षे हे पायी रस्ता क्रॉस करीत असतांना त्यांना भरधाव वेगात धडक बसुन अपघात होवुन अपघातात त्यांचे बरगडीला, उजवे हाताला, उजवे खांदयाला मार लागुन किरकोळ व गंभीर दुखापत होणेस कारणीभूत होवुन निघुन गेला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा/बिराजदार ९४२३४६६९३०

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड६८८/२०२६भा. न्याय संहिता कलम ३०६, प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०५/११/२०२६ रोजी रात्री ०९/३० वा. ते दि. ०६/११/२०२६ रोजी सकाळी ०६/३० वा. गोयल गरीमा सोसायटी, समोर फॅब्रिकेशन गोडावूनमध्ये पार्क केलेली इनोव्हा गाडी क्र.एम.एच.१४/एल.यु. ०९५५ या गाडी मधुन केशव नगर, चिंचवड गाव चिंचवड पुणे

गुन्हा दाखल :- दि.१३/११/२०२६ रोजी २२/३८ वा

फिर्यादी :- सचिन संपतराव काकडे वय -४७ वर्षे, धंदा- शेती, रा. फ्लॅट नं. १०४, एच- विंग गोयल गरीमा सोसायटी केशवनगर चिंचवडगाव, चिंचवड, पुणे

आरोपी :- महेंद्र राजपुत वय-२० वर्षे, रा. बलिराज धुरीखेडा ,निहास्था रायबरेली राज्य - उत्तरप्रदेश

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी आरोपीत याने फिर्यादी यांची इनोव्हा कारमध्ये ठेवलेले रोख रुपये ३,००,०००/रु रक्कम फिर्यादी यांचे समंतीशिवाय घेवुन मुळ गावी उत्तर प्रदेश येथे गेला होता. तो परत येईल म्हणुन फि यांनी त्याची वाट पाहीली. दरम्याण दिवाळी सण असल्याने फिर्यादी मुळ गावी गेले.तेथुन आरोपी यास फोन केले असता यातील आरोपी याने फि यांचा फोन उचलणे बंद केले. त्यावेळी फि यांची खाजी झाली कि, यातील आरोपीत याने फि यांची रोख रक्कम ३,००,०००/रु लबाडीचे इराध्याने चोरी केली आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि/दुधे ९१७२५८२५०१

०६.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	देहुरोड ४७७/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि.१२/११/२०२६ रोजी पहाटे ०१.०० ते ०४.०० वा च्या सुमारास राहते घरासमोर पार्किंगमधून
गुन्हा दाखल	:-	दि.१३/११/२०२६ रोजी ००/१३ वा.
फिर्यादी	:-	गणेश बाळासाहेब हगवणे वय-४४ वर्षे व्यवसाय-शेती रा-विठ्ठलनगर,एच पी पेट्रोलपंपाजवळ,देहुगांव. ता हवेली जि पुणे
आरोपी	:-	अज्ञात इसम
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची ३००००/-रु मोटर सायकल नंबर - MH14 3774 राहते घरासमोर पार्किंग करून ठेवलेली मोटर सायकल ही कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करून नेली आहे. म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोहवा/ढवळे ८५५१०६२०१३